# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. १३ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक २०/०७/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. **२०/०७/२०१९** शनिवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती श्री.जितेंद्र भगवानराव मराठे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. श्री.जितेंद्र भगवानराव मराठे, सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| बालाणी भगतराम रावलमल | कोल्हे प्रविण रामदास |
| ढेकळे सदाशिव गणपत | सनकत चेतन गणेश |
| बेंडाळे उज्वला मोहन | कापसे मयुर चंद्रकांत |
| **सोनवणे सुरेश माणिक** | पाटील प्रतिभा सुधिर |
| **पोकळे दिलीप बबनराव** | लढ्ढा नितीन बालमुकूंद |
| खडके सुनिल वामनराव | भंगाळे विष्णू रामदास |

सदर सभेस, मा.आयुक्त , श्री.उदय टेकाळे,मा.उपायुक्त.श्री.लक्ष्मीकांत कहार, ,मा.उपायुक्त.श्री.चंद्रकांत खोसे, मुख्यलेखापरिक्षक . श्री.संतोष वाहुळे, नगरसचिव . श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

मा.सभापती :- नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

**नगरसचिव :- सभेला सुरुवात करणेत येत आहे.** आजच्या सभेकरिता सन्मा. सदस्या सौ.हाडा शुचिता अतुलसिंह यांचा रजेचा अर्ज आलेला असुन तो मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेला आहे.

श्रध्दांजलीबाबत सन्मा.सदस्यांनी दिलेल्या प्रस्तावाचे नगरसचिव यांनी वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १३७ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा | शहरातील व्दारका इंडस्ट्रिज अन्ड ट्रॅान्स इलेक्ट्रीकचे संचालक, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष तसेच लेवा युवक मंडळाचे माजी अध्यक्ष कै.अनिल श्रीधर बोरोले यांचे अपघाती निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत संपुर्ण सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात संपुर्ण सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**अभिनंदनाबाबत सन्मा.सदस्यांनी दिलेल्या प्रस्तावाचे नगरसचिव यांनी वाचन केले.**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १३८ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | श्री.नितीन बालमुकुंद लढढा | मा.श्री.जितेंद्र भगवान मराठे,सभापती,स्थायी समिती यांनी म.न.पा. मालकीचे गिरणा पंपींग परिसर सुशोभिकरण करणे व पर्यटन स्थळ बनवणेचे काम हाती घेतलेले असुन शासन स्तरावर सुध्दा या बाबतीत त्यांनी व्यक्तीश पाठपुरावा करत आहेत त्याबद्दल त्यांचे अभिनंदन तसेच सौ.बेंडाळे उज्वला मोहन यांनी मनपा दवाखान्यात नागरीकांना मोफत शासनाव्दारे Laboratory Services उपलब्ध करुन देण्या संदर्भात मागील सभेत प्रश्न उपस्थित केला होता. त्या अनुषंगाने सर्व सन्मा.सदस्यांना त्यासंदर्भात शासनाचे पत्र दवाखाना विभागामार्फत देण्यात आले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. |

**नगरसचिव:- विषय क्र. १)** दि.२६/०६/२०१९ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १३९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि.२६/०६/२०१९ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री. बालाणी भगत रावलमल**

**अनुमोदक :- श्री. सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र. २)** कवियत्री बहिणाबाई उदयान येथील जागा करार रद्द करणे बाबत विकासक सौ.शारदा कमलाकर खडके रा.२०४ विठ्ठल पेठ जळगांव यांनी दिलेल्या अर्जाचे अनुषंगाने प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १४० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, खान्देश कन्या कवियत्री बहीणाबाई चौधरी उदयान येथील १८ मी X १८ मी जागा मिनी ट्रेन व इतर खेळणी लावणे ९ वर्षाकरीता भाडे तत्वावर दर ३ वर्षांनी १०% जास्त दराने वाढ करणेकामी स्थायी समिती ठराव क्र.१२३१ दि.१९/०७/२०१३ अन्वये मान्यता मिळालेली आहे. मात्र आयुक्त यांचे दिनांक २३/०१/२०१४ रोजीच्या मान्यतेनुसार दर ०३ वर्षाकरीता ३०% भाडेवाढ करुन दिनांक ०१/०२/२०१४ पासुन ०९ वर्षाकरीता उदयान जागा भाडे तत्वावर देणेबाबत मान्यता देण्यात आलेली असुन विकासक सौ.शारदा कमलाकर खडके यांचे मार्फत उदयान जागेचा वापर सुरु आहे. विकासक सौ.शारदा कमलाकर खडके रा.२०४ विठ्ठल पेठ जळगांव यांचा कवियत्री बहीणाबाई चौधरी उदयान येथील जागा करार रद्द करणे बाबतचा अर्ज दि.०८/०५/२०१९ रोजी प्राप्त झाला आहे. अर्जानुसार अर्जदार यांनी बहिणाबाई उदयानाचे १ कि.मी. परिसरामध्ये नव्याने भाऊंचे उदयान तसेच महात्मा गांधी उदयान चांगले स्वरुपात विकसित झालेले असल्याकारणामुळे कवियत्री बहिणाबाई उदयानामधील नागरिकांची व लहान मुलांची वर्दळ कमी झालेली असल्यामुळे मासिक भाडे भरणे आता शक्य होत नसल्याचे कळवुन जागा ताब्यात घेवुन भाडे पट्टा करार रद्द करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

दिनांक २९/०३/२०१७ रोजीच्या करारनाम्यानुसार उक्त कामाची मुदत दि.३१/०१/२०२० पावेतो आहे, तथापी अर्जदार यांनी मासिक भाडे भरण्यासंदर्भात असमर्थता दर्शविलेली आहे. मुदतीच्या आतच अर्जदार यांनी कामाचा मक्ता रद्द करणे करीता महानगरपालिकेस अर्ज दिलेला आहे. मात्र करारनाम्यात काम मध्येच मक्तेदाराने सोडले तर काही दंडाची तरतुद नाही. अर्जदार यांनी दि.३० ऑक्टोबर २०१८ पर्यंत

होणारे भाडे पावती क्र.२३०११ दि.०२/०५/२०१९ अन्वये भरलेले असल्याने विकासक सौ.शारदा कमलाकर खडके रा.२०४ विठ्ठल पेठ जळगांव यांचेकडून आज पावेतोचे भाडे भरुन घेवुन सदर कामाचा मक्ता रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र. ३)** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०१९ करीता श्री.महेंद्र दत्तात्रय पवार यांची कंत्राटी तत्वावर सिटी कॉर्डीनेटर म्हणून जळगांव शहर महानगरपालिकेत अटी शर्तीस बंधनकारक राहुन करार तत्वावर ६ महिने करीता तात्पुरती नियुक्ती करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १४१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र नागरी विकास अभियान, संचालनालय स्मार्ट सिटी अभियान, अमृत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचेकडील कार्यकारी संचालक कडील पत्र क्रं.राअस/एसएमएम/सिको/नियुक्ती/२३२२/२०१७-१८ दि.०७/१०/२०१७ अन्वये श्री.महेंद्र दत्तात्रय पवार राहणार जळगांव यांची स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०१८ करीता कंत्राटी तत्वावर सिटी कॉर्डीनेटर म्हणुन जळगांव महापालिकेत कंत्राटी तत्वावर अटी शर्तीस बंधनकारक राहून नियुक्ती दि.०७ ऑक्टोंबर २०१७ पासुन रु.३०,०००/- मासिक परिश्रमिक भत्ता/मानधनावर आयुक्त यांचे प्रशासकिय मान्यता आदेश क्रं.०६ दि.०६/१२/२०१८ अन्वये १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून नियुक्ती करण्यात आलेली होती. त्यांची मुदत दि.०४/११/२०१८ रोजी संपुष्टात आलेली होती.

तद्नंतर महासभा ठराव क्रं.९२३ दि.०५/०५/२०१८ तसेच स्थायी समिती ठराव क्र.३३ दि.१५/११/२०१८ अन्वये आयुक्त यांचे प्रशासकिय आदेश क्रं.६ दि.०६/१२/२०१८ अन्वये श्री.महेंद्र पवार यांना शहर समन्वयक म्हणून दि.०४/११/२०१८ रोजीच्या दिनांकापासून ६ महिन्याकरीता रु.३०,०००/- परिश्रमिक भत्ता / मानधनावर नियुक्ती आदेश देण्यात आलेले होते. तथापी त्यांची माहे ०३ मे २०१९ अखेर मुदत संपत असल्याने स्वच्छ सर्वेक्षण - २०२० कामी त्यांना पुढील ६ महिन्यांसाठी M.I.S, I.E.C व GeM Expert म्हणुन मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

स्वच्छ सर्वेक्षण-२०२० करीता स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन (डी.पी.आर.) अंमलबजावणी कामी श्री.महेंद्र दत्तात्रय पवार यांना त्यांचे मागील कामाचा अनुभव, संगणक प्रणालीचे ज्ञान व इत्यादीमुळे देशातील एकूण ५००० स्पर्धक शहरामधून जळगांव शहराचा ७६ वा क्रमांक प्राप्त झालेला असून स्वच्छ सर्वेक्षण २०१९ करीता फायदा दिसून आलेला आहे. त्यामुळे श्री.महेंद्र दत्तात्रय पवार यांची ६ महिने करीता कंत्राटी पध्दतीने रु.३०,०००/- दरमहा परिश्रमिक भत्ता / मानधनावर अटीशर्तीस अधिन राहून दोन दिवसाचा खंड देवून दि.०६ मे २०१९ पासून श्री.महेंद्र दत्तात्रय पवार यांची कंत्राटी तत्वावर सिटी कॉर्डीनेटर म्हणून नियुक्ती देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ (१) ते (३) अन्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच प्रस्तुत कामी येणारा खर्च एकुण रक्कम रु.१,८०,०००/- मात्र म.न.पा.फंडातून अदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र. ४)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १४२ पारित करण्यात आला.**

**असा ठराव करणेत येत आहे की,** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.३१ दि.२७/०६/२०१९ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१७ मधील स.क्र.१३६/३,१३६/३२+२+३(पी) मध्ये आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे तसेच स.क्र.१४/३ मधील नाल्यास संरक्षण भिंत बांधकाम करणे कामी मक्तेदार स्वप्नील नरेंद्र चौधरी यांचे निविदा रकमेपेक्षा ६.६६% कमीचे दर रक्कम रु.१२,१९,६५०/- मात्र खर्चाची संविदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

श्री.नितीन लढढा :- २०१७ साली झालेला करारनामा त्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेला माहिती मिळाली दि.२६/०४/२०१९ ला आणि ४ महिने माहिती पुरविण्यात विलंब झाला. खुप महत्वकांशी योजना आहे आणि या योजनेच्या अनुषंगाने आपल्या ६ रुग्णालयात याचा सेटअप उभारण्याच्या संदर्भात भुमिका या पत्रावरुन लक्षात येते. आता या ६ रुग्णालयात सेटअप उभारण्याची सेवा कार्यान्वीत झाली का नाही तर केव्हा सुरु होईल आणि गरजु लोकांना याचा लाभ कुठपर्यंत मिळेल तर वैद्यकीय अधिकारी यांनी सभागृहाला अवगत करुन द्यावे.
वैद्यकीय अधिकारी :- मा.सभापती, चालु आहे ती योजना आणि आपले लोक सकाळी ओ.पी.डी.त जाऊन बल्ड सॅम्पल कलेक्शन करतात आणि दुसऱ्या दिवशी त्यांना रिपोर्ट दिला जातो. असे नागरीक योजनेचा फायदा घेतात.
श्री.नितीन लढढा :- साधारणता दररोज किती पेशन्ट दररोज येतात.
वैद्यकीय अधिकारी :- आता ॲकझेक्ट आकडा सांगता येणार नाही तपास करुन सांगतो.
श्री.नितीन लढढा :- काही तपासण्या खाजगी दवाखान्यात केले जातात तर त्याही आपल्याकडे केल्या जातात का ?
वैद्यकीय अधिकारी :- काही लोक तपासण्यांची चिठ्ठी बाहेरुन घेऊन येतात आणि आपल्याकडे पेपर कडुन तपासणी करुन घेतात.
श्री.नितीन लढढा :- खुप महत्वकांशी योजना आहे. याची मोठया प्रमाणावर जाहिरात होणे अपेक्षित आहे. कारण चाचण्यांच्याच नांवाखाली लुट होत असते. आमच्या तुमच्या सारखे लोकांना सुध्दा ही माहिती सौ.उज्वलाताईंनी प्रश्न उपस्थित केला तेव्हा माहिती झाली. बऱ्याच वेळी रुग्णांची आर्थिक परिस्थिती जेव्हा नसते. तेव्हा ते नगरसेवकांकडे माहिती किंवा काही आर्थिक मदत उपलब्ध होईल का या साठी येतात. जर नगरसेवकांनाच माहिती नसेल तर या योजना पुर्ण होणार नाही. आणि गरजुंना फायदा भेटत नाही.
मा.सभापती :- आपण काही बॅनर किंवा फलक या जाहिरातीसाठी लावले आहे का ?
वैद्यकीय अधिकारी :- सर जेव्हा आपले कर्मचारी सॅम्पलसाठी जातात तेव्हा ते घरोघरी देतात माहिती या योजनेबाबत की अशी योजना आहे.
श्री.नितीन लढढा :- जेव्हा असे काही रुग्ण आपल्याकडे येतात तर आपण खाजगी डॉक्टरांना विनंती करतात की त्यांची मदत करावी. पण आपल्याला किंवा आपल्या कोणीही प्रतिनिधीला या योजनांची माहिती असेल तर आपण रुग्णाची तात्काळ मदत करु शकतात. तर लवकरात लवकर या योजनांची माहिती आम्हाला अवगत करावी तर खरे अर्थाने या योजना खरी रुग्णांपर्यंत पोहचविण्यात मदत होईल. मागच्या सभेमध्ये मा.आयुक्त साहेब उपस्थित नव्हते आणि मा. श्री.वाहुळे ही उपस्थित नव्हते. तर त्या सभेत आपण काही आर्थिक विषयांवर चर्चा केलेली होती. आपण महाराष्ट्र अधिनियम कलम १५२ च्या अनुषंगाने चर्चा केलेली होती. मा.सभापती महोदय आपण सांगितले होते की मा.आयुक्त साहेब आले नंतर त्यांच्याशी चर्चा करुन हा विषय आपण पुढील महासभेत घेण्याची भुमिका व्यक्त केलेली होती. मा.सभापती आपल्या अनुमतीने मा.आयुक्तांना विचारु इच्छितो की, साधारणता जवळपास ३३५ कोटी रुपये थकबाकी घेणे दिसुन येते. दुसरी जर थकबाकी धरलीतर, ३८ कोटी खुलाभुखंड कर, ३५ कोटी मालमत्ता कर, २० कोटी घरकुल धारकांचे कर आहे. ३५० कोटी गाळेधारकांकडुन आहे. असे जवळपास ४००-४५० कोटी रुपये महानगरपालिकेचे स्वत:च्या हक्काचे उत्पन्न आहे. एकीकडे गाळेधारक त्रस्त आहे एकीकडे महानगरपालिका त्रस्त आहे. दोघी त्रस्त आहे पण मार्ग काही दिसत नाही. मा.पालकमंत्र्यांसोबत बैठक आयोजित केली आणि

मा.मुख्यमंत्र्याशी ही चर्चा करुन निर्णय घेतला. एक राज्य शासनाचा एक मत आहे दुसरीकडे मा.आयुक्तांचा एक मत आहे. ज्या वेळेस मा.आयुक्त साहेबांनी जेव्हा दिव्यमराठीला भेटी दिल्या तेव्हा हा मुद्दा वृत्तपत्रकाच्या संपादकांकडुन सुध्दा उपस्थित करण्यात आलेला होता. मा.आयुक्तांचे स्टेटमेंट वृत्तपत्रातुन वाचण्यात आले की मार्च २०१९ पुर्वी वितरीत करण्यात आलेल्या बिलांमध्ये कुठल्याही प्रकारची सुट देता येणार नाही. एकीकडे सुट प्रशासन देऊ शकत नाही. राज्य शासनाकडुन मार्ग काढण्याचे मार्ग संपुष्टात आलेले दिसत आहे. अश्या परिस्थितीमध्ये कायद्या मध्ये जी काही उपलब्धता आहे त्या उपलब्धतेचा फायदा कमीत कमी ते गाळेधारकांना दिला तर काय नुकसान होईल. ऐवढे ४००-५०० कोटी आपण राज्या शासनाकडुन मागुन घेऊ. फक्त थकबाकी ७-७ वर्ष कागदांवर ओढायची याला काय अर्थ आहे. स्थायी समितीला कलम १५१ खाली दिलेले अधिकारात स्पष्ट आहे की ज्या थकबाकी धारकांची थकबाकी वसुल होण्या जोगी नसेल तर ती थकबाकी स्थायी समितीच्या मान्यतेने आयुक्तांनी निर्लेखित करण्यात यावी. कुठेतरी हा विषय संपवावा लागेल. मला सांगा मे.सुप्रिम कोर्टाने निवाडा घेऊन साधारणता दि.१२/०४/२०१७ पासुन आता जवळपास दोन वर्ष पुर्ण होतील. म्हणजे कर्नाटक सरकार पेक्षा ही काम माठे आहे. जसे कर्नाटक सरकार सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाचा उल्लंघन करतात तश्या पध्दतीचा कारभार आपला दिसुन येत आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागुन जवळपास २ वर्ष झाले.कलम १५२ अन्वये थकबाकीची रक्कम निर्लेखित करून टाका तसेच गाळेधारकांना स्पष्ट सांगुन टाका की तुम्हाला उद्यापासुन नविन बिले येतील व ती रक्कम तुम्हाला भरावी लागेल आमचा उध्दार काय व्हायचा तो होईल व संपुर्ण कर्जमाफी देवुन टाका .

मा.सभापती :- भाऊ तुमचे म्हणणे बरोबर आहे की सुट देवुन टाका पण आपण परत परत त्याच गोष्टींकडे जात आहेत.

श्री.सुनिल खडके :- ही जबाबदारी तुमची होती आणि तुम्हाला आमच्याकडुनच करून घ्यायचे आहे आत्ता पावेतो तुम्ही सत्तेत असतांना केलेले नाही आणि आता ती जबाबदारी आमच्यावर टाकणे बरोबर नाही .

श्री.विष्णू भंगाळे :- भाऊंनी मुद्दा मुद्येसुद मांडलेला आहे त्यावर काहीतरी निर्णय घ्या .

श्री.सदाशिव ढेकळे :- भाऊ आपण महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढी संदर्भात बोलत होते.त्यास सर्वांनी संमती दिली तुम्ही असे म्हणत आहेत की महापालिकेचे उत्पन्न संपवुन टाका .

श्री.नितीन लढढा :- माझे म्हणणे एवढेच आहे.

श्री.सुनिल खडके :- तुम्ही फक्त आम्हालाच बोलत आहेत आपण यापुर्वी काय केले आहे ?

श्री.नितीन लढढा :- हा विषय तुम्ही किती दिवस थंड बस्त्यात ठेवाल , सभापती महोदय ढेकळे साहेबांनी जे बोलेले मी त्यांच्या या गोष्टीचा आदर करतो व सन्मान करतो ढेकळे साहेबांनी विषय काय काढला की आपण महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढी संदर्भात बोलत होते मान्य आहे .

मा.सभापती :- मला येथील सर्व सदस्यांना एक सांगायचे आहे की आपण येथे नगरपालिकेपासुन बरेच जण सदस्य आहेत गाळयांचा प्रश्न ठिक आहे , यानंतरचे महापालिकेचे उत्पन्न तेच आहे का भाऊ विरोध हा सभागृहात झालाच पाहीजे आपणांस या महापालिकेची आर्थिक स्थिती माहिती आहे . महापालिकेच्या बऱ्याच अशा बाबी आहे की कमीत कमी उत्पन्नात २० टक्के तरी भर पडु शकतो यात जर आपण सर्व सदस्यांनी लक्ष घातले तर ज्या काही योजना आहेत त्या ठिक आहे , आपण साधारण ६ ते ८ वर्षापासुन हे प्रकरण बघत आहोत पण आपण त्याकडे लक्ष देत नाहीत , महापालिकेच्या अश्या भरपुर प्रापर्टी आहेत की त्यातुन आपण भरपुर उत्पन्न आहे आपण त्यापासुन उत्पन्न वाढवले पाहीजे आपण एक नामांकीत व्यक्तीमत्व आहे आपण एखाद्या बँकेस तयार करा ना आपले उत्पन्न येथुनही वाढु शकते .

सौ.उज्वला बेंडाळे :- आपल्याला माहितीही नाही की महानगरपालिकेच्या कीती प्रॉपर्टी आहेत .

मा.सभापती :- भाऊ आपण एकच विषय घेवुन बसले तर काम होणार नाही .

श्री.नितीन लढढा :- सभापती महोदय माझा राजकीय टिका करण्याचा हेतु नाही , मी सदस्यांच्या भावनेचा आदर करतो सभापती महोदय सत्ता आपल्याला चालवायची आहे लोकप्रतिनिधी म्हणुन लोक आपल्याकडे त्यांच्या भावना व्यक्त करतात .

मा.सभापती :- गाळेधारक पण या शहराचे नागरीक आहेत , ज्यावेळेला आपण भुमिका घेतो दोघेही कंडीशन आहेत त्या वेगवेगळया आहेत गाळेधारक असतील आपल्याला दोघांनाही समन्वयाने निघावा .

श्री.नितीन लढढा :- ही आमची पण ईच्छा आहे.

श्री.भगत बालाणी :- माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे की , गाळेधारकांच्या संदर्भात जो महासभेने ठराव केलेला आहे तो ठराव आपण मान्य करा किंवा विखंडना साठी पाठवा आमचे असे मत आहे.

श्री.नितीन लढढा :- बरोबर आहे , आमचेही तेच म्हणणे आहे.

श्री.भगत बालाणी :- आपण तो ठराव मान्य करावा किंवा शासनाकडे विखंडनासाठी पाठवा शासनाला काय निर्णय घ्यायचा असेल ते घेतील किंवा मधील मार्ग निघत असेल तर बघु.

श्री.नितीन लढढा :- असे किती दिवस आपण तो विषय थंडबस्त्यात ठेवणार.

मा.आयुक्त :- मा.सभापती महोदय व सर्व स्थायी समिती सदस्य आपल्या शहराचा जिव्हाळयाचा प्रश्न या निमीत्ताने आज उपस्थित झालेला आहे आणि या मध्ये दोन बाजु आहेत , एक बाजु आपण आत्ता जे बिले दिलेले आहेत ३१ मार्च ला तर त्या मध्ये जे भाडे नमुद केलेले आहे किंवा जी रक्कम नमुद केलेली आहे म्हणजे जे काही रेडीरेकनर आहे व पॅनल्टी आहे याचा विचार करून दिलेली आहे. ज्या वेळेला एखादा गाळा भाड्याने दिला जातो. त्यावेळेस मुदत असल्यापर्यंत ते त्याचा अधिकृत वापर करु शकता. अधिकृत वापर करतांना त्याची जी अटीशर्ती असतात. दर महिन्याला भाडे भरणे, पोटभाडेकरु न ठेवणे, गाळयामध्ये काही फरक न करणे असे जे Conditions असतात.सन २०१२ मध्ये करार संपलेला आहे आणि २०१२ पासुन त्या गाळयांचा अनधिकृत भोगवटा चालु आहे. त्यावेळेला दोन Conditions असतात. एक त्यांना युनिट ॲक्ट खाली नोटीस देऊन खाली करणे, आपली महानगरपालिकाची ८१ ब ची जी कार्यवाही आहे ती पुर्णपणे झालेली आहे. प्रश्न आहे फक्त भाडे वसुल करण्याचा. भाडे वसुल करण्यात अशी पध्दत आहे की जर आपण तो गाळा नव्याने दिला असता तर जी काही रक्कम आली असती तर त्याच अनुषंगाने महानगरपालिकेचे जे काही टॅक्स असतील, दंड असतील या सगळयांचा विचार करुन ती नुकसान भरपाईची रक्कम वसुल करण्यात यावा.आज ३१ मार्च ला आपण जी बिले दिलेली आहे ती नुकसान भरपाईसह दिलेली आहे. या संदर्भात लावला जातो की आम्हाला मुळ भाड्या प्रमाणे विचार करा. त्याचा काहीही अर्थ नाही आहे. तो लिज संपलेला आहे. कागदोपत्री ती लिज आहे की नाही त्याच्या बद्दल सुध्दा शाशंकता आहे, शासनाने भाडे आकारणी करावी असा नमुद केलेले आहे. त्यामुळे जे काही आपण रेडीरेकनर प्रमाणे दर महिन्याला भाडे भरले असते तर २% चा विषय आला नसता त्यामुळे ती रक्कम लागली. जे काही मधल्या वर्षामध्ये आपण जो काही ठराव केलेला आहे. आपण जर प्रत्येक वर्षाचा विचार केला, एखादा गाळेधारक असला आणि त्यानी गाळा सोडला नाही, त्याच्यात दिड ते दोन पट पर्यंत मागणी करु शकतो आपण, दर वर्षी त्यामुळे तसा विचार जर ही केला तर ही जी चार पट आहे ही अत्यंत Reasonable आहे. जी Amount आपल्या २०१९ च्या बिलामध्ये आहे. त्यात अजुन कुठल्या गोष्टी आहे तर त्याच्या मध्ये शास्ती २४% आहे, त्यानंतर जी.एस.टी.ची Amount आहे. या नंतर आपले जे मालमत्ता कर आहे, मालमत्ता कर, शिक्षण कर आहे, या सगळयांचा जर विचार केला तर. १००% जरी वसुल झाला तर बऱ्याच पैकी पैसे याच्यातुन शासनाकडे जाणार आहे. साधारण प्रमाणे ४० ते ४२% रक्कम शासनाकडे जाणार आहे, जरी आपण संपुर्ण ३५० कोटी वसुली केली. या सर्व गोष्टींचा विचार करता, मध्यंतरी काही शंका उपस्थित झाल्या. तर त्या संदर्भात एक ठराव Already विखंडनाला गेलेला आहे आणि त्याच्या अनुषंगानेच त्याचा पुढचा ठराव आहे. त्यामुळे ते विखंडनाला पाठविण्याची आवश्यकता नाही असे माझे म्हणणे आहे, तो ठराव जर संपला तर हा ठराव ही संपणार आहे, या उपरही या ठरावाप्रमाणे महानगरपालिकेचे नुकसान होणार आहे हे सुध्दा शासनाला अवगत करण्यात आलेले होते. माझी सर्व सभागृहाला विनंती आहे, मार्च अखेरचे जे पैसे आहे ते भरुन पुढचा काही तरी सुरु करावा लागेल,

श्री.भगत बालाणी :- मा.आयुक्त साहेबांनी गाळेधारक आणि त्याच्या कराबद्दल आणि भाड्या बद्दल सविस्तर माहिती दिली आणि आमच्या ज्ञानात भर पडली. समितीचा एक ठराव आपण विखंडनासाठी पाठविलेले आहे आणि त्या अनुषंगाने की हा १ पटचा ५ पट करणे संदर्भातला ठराव पाठविणेची गरज नाही. समितीचा जो ठराव आपण पाठविलेला आहे त्याचा शासनाकडुन काही निर्णय झाला नाही. मग आता जो ठराव आहे हा विखंडनाला पाठविण्यात अडचण काय आहे.

मा.आयुक्त :- बघा आपण फार माझ्या सोईचे बोलत आहे. त्या समितीच्या ठरावाचा जर तुम्ही विचार केला तर त्यात एक वाक्य तुम्ही छान टाकलेले आहे. "कुठल्याही न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होऊ नये" त्याच्यामुळे विखंडनाचा आवश्यकता नाही आहे. महापालिका वसुली करत नाही म्हणुन आपण कल्परिट असणार याची सुध्दा शक्यता आहे. काही गरज नाही पण जर आपण म्हणत आहोत तर आजच्या आज पाठविण्याची व्यवस्था करतो.

श्री.नितीन लढढा :- हे सर्व झाले पण मुळ मुद्दा हे की ही वसुली होईल का ? होईल तर कश्या प्रकारे होईल केव्हा होईल आणि होणार की नाही. माझा मुद्दा या संदर्भात उपस्थित झाला की, ७-७ वर्ष वसुली होत नाही. आणि अश्या रकमा निर्लेखित करण्यात संदर्भातली ती तरतुद आहे.

श्री.भगत बालाणी :- कोणती तरतुद ?

श्री.नितीन लढढा :- कलम १५२

श्री.भगत बालाणी :- कलम १५२ या वर्षी तयार झाला का ?

श्री.नितीन लढढा :- २०१२ ला अत्यंत चांगल्या प्रकारे दिलेला प्रस्ताव होता, त्याला कोणी खुटे टाकले हे सर्व व्यापाऱ्यांना माहिती आहे आणि त्याचा ते आज पश्चाताप करत आहे. परंतु पश्चाताप करण्याची वेळ निघुन गेलेली आहे आता जे काही आहे ते सोसायचे आहे.

मा.सभापती :- नितीन भाऊ आपण त्यावेळेला सक्षम होते आणि हे काम करु शकले असते.

श्री.नितीन लढढा:- या संदर्भातील भुमिका आजही स्पष्ट पणे सभागृहातील सदस्यांचे वृत्त खंडन करण्याचे धारीष्ट मा.आयुक्त साहेब येथे दाखवित आहेत , परंतु पुढे प्रगती होत नाही का काय कारण आहे याचा कोणी जाब विचारतो का ? त्यांचे हाताचे कठपुतलीचा खेळ कोण चालवत आहे ते त्यांनाही माहिती आहे पण आज सभागृहात बोलु शकत

नाहीत म्हणून माझे म्हणणे आहे की ती रक्कम एकतर वसुल करा किंवा निर्लेखित करा बाकी काही म्हणणे नाहीये तसेच आयुक्त साहेबांनी एक पर्याय स्पष्ट केला की त्या रकमेत एक रूपयाही कमी होणार नाही असे दोन मिनिटांपुर्वी सभागृहात सांगीतले मग जर कधी तसे होणार नसेल मग वाट कुणाची बघायची , कोणत्या आदेशाची वाट पाहायची साधारण ७ वर्षापासुन हा खेळ सातत्याने सुरू आहे हा खेळ पुढे किती वर्षे चालेल हे मलाही माहित नाही , आपण या महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीकोनातुन चर्चा करतोय मी राजकारण करत आहे असे जर ते म्हणत असतील तर तो त्यांचा उद्योग आहे मला असे म्हणायचे नाही , परंतु याचा कुठेतरी तोडगा निघाला पाहीजे हा विषय संपुष्टात यायला पाहीजे , सत्ता आपली आहे , महानगरपालिका आपली आहे सगळे काही आपल्या कडे असतांना कि ज्यावेळेला महानगरपालिकेची सत्ता आमच्या ताब्यात होती त्यावेळेला काही बंधने होती आणि आमची सत्ता असल्याकारणाने आम्ही गाळेधारकांना न्याय देऊ शकलो नाही आम्ही मान्य केले , गाळेधारकांनीही मान्य केले , महानगरपालिकेची सत्ता प्राप्त करून एक वर्ष झाले मग एक वर्ष काय केले आपण , निर्णय राज्य शासन इतके सक्षम आहे आणि हे सभागृह त्यापेक्षा जास्त सक्षम आहे कारण त्या पेक्षा मोठे बहुमत आपल्याकडे या सभागृहाला आहे मग या एक वर्षात या अवांतर चर्चाच का कराव्या लागतात ? त्याचा तोडगा का निघत नाही याचे कोणी आत्मचिंतन करतच नाहीये कारण त्याच आत्मचिंतन करून कितीही घुसळले तर विषच बाहेर पडणार आहे अमृत पडणार नाही परंतु आपण अमृत च्या प्रतिक्षेत त्या विषयाला उशिर करत जात आहे , अमृत यांच्याकडुनही निघणार नाही आणि आमच्याकडुनही निघु शकत नव्हत , आम्ही आमची भुमिका त्यावेळी स्पष्ट केलेली होती आम्ही ज्यावेळेला ही प्रक्रीया गाळे ताब्यात घेण्याची भुमिका आम्ही सुरूवात केलेली होती आणि काही गाळे त्यावेळेला सिल ही झालेले होते आज आपण बघा एका वर्षात किती गाळे सिल केले? का नाही केले याचे कारण सांगा , आश्वासने नका देवू नविन विषय आहे जो काही निधी येईल त्याचा विनियोग तुम्हाला सत्ताधारी म्हणुन करायचा आहे , त्याचे श्रेय तुम्हालाच घ्यायचे आहे कारण आम्ही विरोधक त्या गोष्टीचे श्रेय घेवु शकणार नाही किंवा घ्यायची काही गरज नाही.

मा.सभापती :- भाऊ आपण सत्तेत आहेत आपली युती झालेली आहे तरी सुध्दा तुम्ही तसे समजत आहात.

श्री.सुनिल खडके :- भाऊ सुरूवात तुम्ही केली

श्री.नितीन लढढा :- तुमचे आभार व्यक्त करतो परंतु भेदभाव कसा होतो एक खुप साधे उदाहरण देतो काहीच मोठा विषय नाही आमचा प्र.क्रं.५ आहे आणि पलिकडे प्र.क्रं.६ आहे पिंप्राळा रेल्वे गेट ते जळकी मिल पर्यंत आता २ ते ४ दिवसांपुर्वी महापालिकेच्या माध्यमातुन रस्त्याची डागडुजी केली गेली वृत्तपत्रामध्ये वाचले की डागडुजीला सुरूवात करण्यात आलेली आहे आम्हालाही आनंद झाला की अत्यंत वाईट परिस्थिती झालेला रस्ता होता , पोलीस स्टेशन च्या हद्यीचे जसे वाद होतात जसे एखादा मृतदेह असतो त्यावेळी ते म्हणतात की ही हद्य आमची नाही किंवा तो ढकलुन तिकडे टाकुन दिला जातो अशा पध्दतीची भुमिका आहे तुम्ही प्रत्यक्ष गेलात तर एकदम तंतोतंत काम करण्यात आले आहे व काम बंद झाले पुढे त्या शाहु नगर मधील रस्त्याची परिस्थिती ज्या ठिकाणी डागडुजी केली गेली त्यापेक्षाही दयनिय आहे इतकी दयनिय स्थिती आहे की त्या रस्त्यावर वाहतुक जास्त आहे कारण की शिवाजी नगरचा पुल बंद झालेला आहे , परंतु धोरणात्मक निर्णय तर असा झालेला नाही की सत्ताधारी असलेल्या वॉर्डातच काम करण्यात यावे ज्यावेळेला नागरीकांनी त्या भागातुन फोन केले तर ते म्हणाले की ५ नंबर मध्ये होत नाही परंतु ६ नंबर मध्ये होत आहे मी स्वत: व विष्णू भाऊ त्या ठिकाणी जावुन आलो .

श्री. सदाशिव ढेकळे :- मी सुध्दा सत्तेत आहे माझ्या वॉर्डात सुध्दा एकही काम झाले नाही जागोजागी खडडे पडलेले आहेत .

श्री.भगत बालाणी :- सभापती महोदय नगरसेवक कोणतेही असतील परंतु या शहराचे आमदार भाजपचे आहेत तसेच लोकसभेचे खासदार भाजपचे आहेत म्हणुन प्रत्येक नागरीक आमचा मतदार आहे प्रत्येक नागरीकाच्या बाबतीत आम्हाला सन्मान आहे याचा त्रास प्रत्येकाला होत आहे मी भोळे साहेब यांचेशी चर्चा केली आहे . मा.विष्णु भाऊ तुम्ही दिशाभुल करु नका .

श्री.विष्णु भंगाळे :- फक्त बोलुन होणार नाही आम्हालाही अधिकार आहे असे करू नका हे सांगणे चुकीचे आहे माझ्या कडे प्रुफ आहे .

श्री.भगत बालाणी :- आता काही भागात रस्ते झाले पण माझ्या वॉर्डात झाले नाही . हे चुकीचे आहे .

श्री.विष्णु भंगाळे :- बरोबर आहे आम्ही तेच मांडतोय .

मा.सभापती :- आपण सर्व सदस्यांनी आपल्या जागेवर बसुन बोलावे , आपण भोळे साहेबांचा खुलासा घेवु

श्री.नितीन लढढा :- आम्ही फक्त या शहराच्या सोईच्या दृष्टीकोनातुन बोलतोय

श्री.विष्णु भंगाळे :- मा.सभापती महोदय बळीराम पेठेतील शिवाजी चौकातील हा खडडा भरपुर वर्षांपासुन आहे .

मा.सभापती :- या सर्व विषयांवर आपण खुलासा घेवु

श्री.विष्णु भंगाळे :- मा.अनिल बोरोले यांचे दुख:द निधन झालेले आहे एक व्यक्तीमत्व ,अजात शत्रुत्व असे व्यक्तीमत्व होत उद्योग पती होते एक सामान्य होते फक्त एका खडडयामुळे व मागुन एक जड वाहन होते म्हणून

त्यांचे निधन झालेले आहे , महानगरपालिकेच्या हद्यीत जड वाहने येण्याची वेळ काय आहे यावर आपण काय करत आहेत यावर काही नियम आहेत का ?

मा.सभापती :- भाऊ आपण हा विषय काढत आहेत चर्चेला काय आहे आता तो प्रभाग कोणाचा आहे ?

श्री.विष्णु भंगाळे :- माझा आहे.

मा.सभापती :- बरोबर आहे आपण सत्तेत आहेत किंवा नाही अधिकाऱ्यांना आपण बोलु शकत नाही का?

श्री.विष्णू भंगाळे :- कितीदा बोलायचे

श्री.नितीन लढढा :- मा.सभापती आपण सभापती आहात, सगळयात पहिले हा विषय स्पष्ट होणे गरजेचे आहे की, ही जबाबदारी नगरसेवकाची आहे की प्रशासनाची. लाईट बंद असले तरी नगरसेवकांना पाहावे लागतात. नगरसेवकांना लोकांनी निवडुन दिलेले आहे की, या शहराची जी काही धोरणात्मक बाबी असतील. ही १००% संपुर्ण जबाबदारी प्रशासनाची आहे. लाईट बंद असेल तर इलेक्ट्रीकल इन्स्पेक्टर असेल त्याच्या खालचा कर्मचारी असेल ही त्याची जबाबदारी आहे की त्यानी त्या त्या प्रभागांमध्ये किंवा क्षेत्रात त्यानी जाऊन तपासणी करायला पाहिजे. कुठल्या भागातील किती दिवे बंद आहे त्याची रिपोर्टींग त्यांनी त्यांच्या वरिष्ठांना करायला पाहिजे. रितसर त्याचे वरिष्ठ लागणारे साहित्याची मागणी देतील त्या वेळेला फक्त तो धोरणात्मक निर्णय या सभागृहाला आहे. अत्यंत विचित्र परिस्थिती आहे, नगरसेवकच सेनेटरी इन्स्पेक्टर होतो, नगरसेवकच हा इलेक्ट्रीकल इन्स्पेक्टर होतो, नगरसेवकच हा सफाई कामगार होतो. आणि त्यालाच सांगावं लागतं की भाऊ इतकी गटार जरा व्यवस्थीत साफ कर. ही जबाबदारी नगरसेवकाची नाही. खड्डा पडलेला आहे तर हे नागरीकांचे कर्तव्य नाही किंवा नगरसेवकांची ही नाही, नागरीकांनी नगरसेवकांना सांगाव आणि नगरसेवकांनी अधिकाऱ्यांना सांगाव असे नाही. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. त्यासाठी त्यांचे मुकादम आहे, त्याचे ही मजुर आहे त्याचे ही शहर अभियंता आहे. तरतुदी आहे. परंतु हे तरतुदी एका अर्थाने पुर्ण होता दिसत नाही. जेव्हा हे आपल्या समोर येतं तेव्हा समजतं की मनपा फंडातुन कोणीही मक्तेदार काम करायला तयार नाही आहे. परंतु जर सिस्टीम योग्य पध्दतीने काम करेल तर ही परिस्थिती निर्माण होणार नाही.

मा.सभापती :- बोला भोळे साहेब.

श्री.एस.एस.भोळे :- दोन महिन्यापुर्वीच आपण गोविंदा स्टॉप ते हनुमान मंदिर पर्यंतच्या रस्त्याचे पॅचवर्क केलेला होता.

मा.सभापती :- तुम्हाला कोणाचा फोन आला होता का हे काम बंद करा ?

श्री.एस.एस. भोळे :- नाही, पुढचा पॅचवर्क जास्त खराब असल्यामुळे मी त्यांना सांगतलं की, बजरंग बोगद्यापर्यंत करा. त्यानंतर कोर्ट चौक ते गणेश कॉलनी या रस्त्यावर ट्रॉफिक जास्त असते म्हणुन ते रस्ता आपण चालु केलेला आहे. तो रस्ता सोमवार पावेतो पुर्ण झाल्यानंतर पुन्हा गोविंदा स्टॉप पासुन हनुमान मंदिरा पावेतो जो काही पॅचेस असेल काम पुर्ण करण्यात येईल .

श्री.नितीन लढढा :- जो रस्ता सगळयात जास्त खराब होता तो का केला नाही आधी .

श्री.विष्णू भंगाळे :- मा.सभापती महोदय सकाळ पेपर मध्ये १७ मे रोजी बातमी आली होती की शाहु नगर रस्त्याचे भाग्य कधी उजळणार. आणि तुम्ही विचारत आहे कोणी सांगितले, आमच्या वार्डाचे इंजिनिअर पुराणिक आहे त्यांना ही आम्ही समस्या बोललो की तुम्ही काय करत आहे. ते ही त्या ठिकाणी आले नाही.

श्री.एस.एस. भोळे :- या कामाचे आपण टेन्डर काढलेले आहे. पण मनपा फंडातुन कोणीही काम करायला तयार नाही. कृपया कोणतीही एजन्सी असेल तर द्या.

श्री.नितीन लढढा :- एजन्सी दिली आणि पेमेंट नाही निघालं तर तो ठेकेदार आमच्या बोकांडी बसतो. तुम्ही सांगितले म्हणुन आम्ही काम केलं.

श्री.प्रविण कोल्हे :- युवा ब्रेगेडने रस्त्यावर साखळी उपोषण सुरू केलेले आहे त्या उपोषणाचा आज चौथा दिवस आहे त्याठिकाणी प्रशासनाचे एकही अधिकारी किंवा कर्मचारी गेलेले नाही काल रात्री एक मुलगा त्याठिकाणी चक्कर येवुन पडला होता जर त्या ठिकाणी काही झाले तर त्याला प्रशासन जबाबदार राहील का ?

मा.सभापती :- त्यांचे काही निवेदन आले आहे का

श्री.सुनिल खडके :- हो तसेच उपोषण कार्यकर्त्यापैकी काही जण या ठिकाणी आलेले आहेत त्यांना आज चार दिवस झालेले आहे प्रशासनाकडुन याबाबत कुठल्याही प्रकारची दखल घेतली गेलेली नाही स्व.अनिलदादा बोरोले ज्या दिवशी वारले त्याच्या दुसऱ्या दिवशी हे लोक उपोषणाला बसले आहेत. त्यामध्ये १८ ते २० वयोगटातील मुले आहेत, प्रशासनाने याची गांर्भीयाने दखल घ्यावी त्यांची साधी उपायुक्त , आयुक्त सो़ा यांनी त्यांची चौकशीही केलेली नाही त्यांनी जी कंम्पलेन्ट केलेली आहे ज्यासाठी ते उपोषणाला बसलेले आहेत .

श्री.विष्णू भंगाळे :- सभापती महोदय सुनिल भाऊंनी जी सुचना मांडली आहे ती बरोबर आहे त्यांच्या सोबत आपले काही नगरसेवक सुध्दा आहेत तरी सुध्दा काहीच उपयोग झाला नाही याला काय म्हणावे लागेल

श्री.सुनिल खडके :- उपोषणास बसलेल्या मुलांच्या भावनांचा विचार करावा व प्रशासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी मी त्यांच्या वतीने विनंती करीत आहे.

श्री.नितीन लढढा:- सभापती महोदय जसे भोळे साहेब म्हणाले की मनपा फंडातुन काम करावयाचे आहे .

मा.सभापती :- मी आपणांस एक उदाहरण देतो भाऊ ऐकुन घ्या आपण मनपाकडे जातो व असे काम करायचे आहे आणि काही काम होते ते नगरसेवकाचेच आहे असे म्हटले जाते , मी जवळ जवळ १० वर्षाआधी मी पिग्मी कलेक्शन चे काम करायचो त्यावेळी आमच्या कॉलनीमध्ये एक डेथ झाली होती त्या व्यक्तीचा मृत्यु अमरनाथ येथे झालेला होता तर त्यांची डेथ बॉडी आणायला तीन दिवस लागणार होते अशावेळी ज्याचे असते तो सुध्दा हात लावायला विचार करतो तर मी त्यावेळी ठरविले होते की त्यासाठी आपण एक गाडी म्हणजे आपण त्याला स्वर्गरथ म्हणतो तर त्यावेळी तो मिळत नव्हता तर अशा घटना घडतात व कालांतराने बदलत जाणार आहे नंतर मी फर्टीलायझरचे काम करायला लागलो होतो त्यानंतर मी अत्यंयात्रेसाठी जी गाडी लागते ती गाडी मी विकत घेतली तर ती गाडी मी बाजार भाव त्या गाडीचा ४० हजार असेल तर मी ती गाडी ९० हजार रू. मध्ये विकत घेतली नंतर मी ती गाडी सेवाभावी सुरू केली मला त्यातुन काही इन्कम आहे किंवा काही असे काहीच नव्हते त्यावेळी तेथील लोक म्हणायचे की मराठेचे चांगले उत्पन्न वाढलेले आहे तरी सुध्दा मी माझे काम थांबविलेले नाही आजपावेतो ते काम सुरू आहे जळगांव शहरात अनेक ठिकाणी बऱ्याच वेळा माझे नगरसेवकांशी संबंध आहेत व बऱ्याच लोकांशी माझे संबंध असतील म्हणुन सांगतो की लोक बोलतच राहणार आहेत काय बोलायचे आहे लोक म्हणतील की भगत भाऊ, नितीन भाऊ यांनी काम घेतले तर बोलु द्या आपल्याला काम करायचे आहे भाऊ .

श्री.नितीन लढढा :- आज याठिकाणी सर्वांनी स्पष्ट केलेले आहे जसे सुनिल भोळे साहेबांनी सांगीतले की समजा या सभागृहातील सदस्यांनी मान्य केले आहे तसेच एखादे काम दिले व त्या एजन्सीने कामाला सुरूवात केली व सदस्य त्या एजन्सीला सांगतात की तुम्ही काही काळजी करूनका मी तुमचे काम करून देईन पण प्रशासनतील उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनीच म्हटले आहे की ज्यावेळी एखादा नगरसेवक एखाद्या मक्तेदाराच्या बिल काढण्यासाठी येतात एखादा अधिकारी बदलल्या नंतर नविन येणाऱ्या अधिकाऱ्याची प्रायोरिटी वेगळी असते .

मा.सभापती :- आता मा.आयुक्त साहेबांची रिटायरमेंटची वेळ जवळ आलेली आहे. यात तुमची ही नैतिकता आहे की तुम्ही येणाऱ्या अधिकारी किंवा साहेबांना सांगायला पाहिजे.

श्री.नितीन लढढा :- राज्य शासनाकडुन एक धोरणात्मक निर्णय करुन टाका की, मागच्या गेलेल्या आयुक्तांच्या जे जे कमिटमेंटस असतील त्या पुढील आयुक्तांना बंधनकारक असतील. आणि पद सोडतांना त्यांनी सर्व कमिटमेंटसचा आढावा घेऊन त्यांना कामे हस्तांतरीत करण्यात यावे.

सौ.उज्वला बेंडाळे :- विष्णु भाऊंनी जे सांगितले त्या मताशी मी पण सहमत आहे. आमची कामे आम्ही करतोच पण वार्डात आम्ही फिरायचे कुठे गटारी स्वच्छ आहे कुठे लाईट बंद आहे ते तक्रार करुन कामे करुन घ्यायची त्या मताशी मीपण सहमत आहे. दुसरा विषय असा की, दि.२५/०४/२०१९ ला मी तुम्हाला येऊन भेटली होती अतिक्रमण विषयी आणि त्या गटारीवरच्या बांधकामास टी.डी.आर. देणे संदर्भात ते अजुन ही मार्गी लागलेले नाही. मी तुम्हाला भेटली त्याच्या ४ महिने आगोदर पासुन तो विषय होता. मी तुम्हाला भेटली दि.२५/०४/२०१९ ला आणि आजची तारीख आहे दि.२०/०७/२०१९ तिन महिने झाले. अजुन ही तो प्रॉब्लेम सॉल होत नाही आहे. ठेकेदारांना नोटीसा येतात त्यांना काम करता येत नाही. तुम्ही धामणे साहेबांना स्पॉटवर जाऊन बघण्याची चिठ्ठी दिली होती. माझ्याकडे ती चिठ्ठी ही आहे. किती दिवस या कामाला लागतील. नागरीक आमच्याकडे येत आहे.

सौ.उज्वला बेंडाळे :- माझा एक विषय आहे आता आपला अर्थ संकल्प आलेला आहे त्यामध्ये आपण मागील जो अर्थ संकल्प मंजुर केलेला आहे त्यामध्ये शहरातील नागरीकांचा विमा करणे संदर्भात मंजुर केलेले आहे पण तो या वर्षाच्या अर्थसंकल्पात घेतला गेलेला नाही म्हणजे मतदार यादीत ज्यांचे नांव आहे त्यांना दोन लाख रू विमा द्यायचा असे मंजुर केलेले होते .

मा.सभापती :- अर्थ संकल्पात आपण अशी तरतूद घेतलेली होती .

श्री.चंद्रकांत वांद्रे:- सुटली असेल तर बजेट मध्ये ती तरतूद करून घेवु.

श्री.नितीन लढढा :- महानगरपालिकेच्या सभागृहातील वातावरण तापलेले आहे , या हॉलमधील ए.सी., पंखे सुध्दा बंद आहेत .

मा.आयुक्त :- आपल्या विभागाचा जर काही विषय निघाला असेल तर विभाग प्रमुख पाहुण्यासारखे का पाहतो हेच कळत नाही .

श्री.सुशिल साळुंखे :- या हॉल मधील ए.सी दुरूस्ती साठी पाठविण्यात आलेला आहे .

मा.आयुक्त :- ते ए.सी लवकर दुरूस्ती करून घ्या आणि सर्व हॉल मधील दुरूस्त्या करून घ्या.

श्री.नितीन लढढा :- सभापती महोदय अतिक्रमण च्या अनुषगांने मी सांगतो , मी मागील मिटींग मध्ये १५ दिवसांपुर्वी मी मा.आयुक्त सोहबांना विनंती केली होती की प्रभाग क्रं.५ हा जळगांव शहरातील मध्यवर्ती भाग आहे आमच्या प्रभागतील नागरीकांना सर्वात जास्त त्रास हा अतिक्रमणा मुळे होतो किंवा या प्रभागात शहरातील नागरीक प्रत्येक काही ना काही कारणा साठी सातत्याने येत असतो , अतिक्रमणाची या ठिकाणी इतकी विचित्र परिस्थिती आहे त्यावर आपण एकही रस्ता दाखवा व हजार रू मिळवा असे बोललो तरी ते हजार रू . आपल्याच खिशात जातील कुणीच

घ्यायला येणार नाही प्रत्येक ठिकाणी ही परिस्थिती निर्माण झालेली आहे , सभापती महोदय अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांच्या होणाऱ्या पगारावरील खर्च किती आहे याची कदाचित कल्पना आपल्याला नसावी , आपण फक्त मनामध्ये अंदाज मांडा की या विभागावर महिन्याला किती खर्च होतो किती होवु शकत असले तुमच्या अंदाजाने ? ढोबळ अंदाजाने सांगा तब्बल ११ लाख ३६ हजार १३५ रू या विभागातील कर्मचाऱ्यांच्या पगारावर खर्च होतात , मी मागील सभेमध्ये बोललो होतो की या विभागाचे नांव बदलवुन टाका अतिक्रमण निर्मुलन विभागाच्याऐवजी अतिक्रमण संवर्धन व संरक्षक विभाग असे ठेवा कारण त्याच्यात अतिक्रमणाला संवर्धन व संरक्षणही दिले जाते , साहेब तुम्ही फक्त तुमची ओळख लपवुन फुले मार्केट मध्ये कुटुंबासोबत संध्याकाळी फक्त एक फेरफटका मारा , सांयकाळी ७ वाजे दरम्यान तुम्ही जा आणि असे जा की तुम्ही आयुक्त टेकाळे साहेब नाहीत जसे पुर्वीचे राजे जायचे. तेथुन आल्यानंतर तुम्ही म्हणाल की मी जळगांव शहराच्या आयुक्त पदावर राहु ईच्छित नाही अन्यथा मला मी ज्या पध्दतीने काम करेल त्या पध्दतीची मुभा देण्यात यावी ईतकी भंयकर परिस्थिती आहे ईतक्या मोठया प्रमाणावर हप्तेखोरी आहे त्या ठिकाणी इंच नि इंच जागेचा भाव लावला जातो त्यांच्या पगारावर खर्च होत नसेल ईतक्या मोठया प्रमाणावर तेथील कमाई आहे , साहेब दुर्देव असे आहे की गर्दीचा फायदा घेवुन त्या ठिकाणी अनेक वेळा चैन स्नॅचिंग होते, महिलांच्या छेडखान्या होतात , त्याच्यावरुन जातीय दंगलीची परिस्थिती निर्माण होते , सुदैवाने त्याच्या समोर पोलिस स्टेशन आहे पोलिस स्टेशन असल्यामुळे कुठला तरी अनुचित प्रकार होण्यापासुन ते क्षेत्र वाचलेले आहे , अन्यथा त्या ठिकाणी रोज जातीय दंगली होतील अशी परिस्थिती त्या मार्केट मध्ये निर्माण होते आणि ती परिस्थिती शहराच्या प्रत्येक भागामध्ये विखरूली जावु लागली आहे. मला आमचे एक सन्मा.सदस्य सांगत होते की आमच्या मास्टर कॉलनी मध्ये दर बुधवारचा बाजार भरायला लागला आहे मी म्हटले त्यांना वेळीच प्रतिबंध करा पायंडा पडु देवु नका अन्यथा पिंप्राळयासारखी परिस्थिती निर्माण होईल जळगांव शहरातील बळीराम पेठ सारखी परिस्थिती निर्माण होईल. एक छोटीशी पाणीपुरीची गाडी, त्याबाबत मी किती वेळा खान साहेबांना फोन केला, किती दा त्यांनी ती उचलुन आणली आणि परत ती गाडी तिथेच लागते. म्हणजेच प्रशासनाचा जे काही धाक या विभागाला असायला पाहिजे ते होतच नाही. तुम्ही जुना कापड बाजाराच्या रस्त्यावर तुमचा चार चाकी वाहन घेऊन चला मी पण येतो आणि तुमचा वाहन विना अडथळयाचा या टोकावरुन त्या टोकावर निघुन गेला तर मी तात्काळ राजीनामा देईल. इतकी वाईट परिस्थिती आहे.

मा.आयुक्त :- विषय लक्षात आला आणि गांर्भिय ही लक्षात आले. हा गंभिर प्रश्न आहे. फक्त माझी सभागृहाला विनंती आहे सन्मा.सदस्यांना विनंती आहे. आम्ही दैनंदिन स्वरुपात काम सुरु करतो. पण आपण काही तरी ठराव केलेला आहे की जप्त केलेला सामान परत द्या. तर हे असेच चालु राहील तर आता जे काही सामान आम्ही जप्त करु ते आम्ही परत देणार नाही.

श्री.भगत बालाणी :- आयुक्त साहेब आणि सभापती महोदय, नेरी नाका ते अजिंठा चौफुली या रस्त्याची आपण स्वत: पाहणी करा.

श्री.सदाशिव ढेकळे :- मा.आयुक्त साहेब आता मनपा फंडातुन कोणीही काम करायला तयार नाही. परंतु महाराष्ट्र स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत आपल्यास सार्वजनिक किंवा व्यक्तीक शौचालय बनविण्याची तरतुद आहे. परंतु त्याला गती दिली जात नाही. काही लोकांनी नाही बनविले शौचालय तर त्यांच्याकडुन रु.६०००/- परत घ्या असे केले पाहिजे. मग आरोग्यचे कर्मचारी व अधिकारी यांनी असे सांगितले की, तुम्ही पहिले शौचालय बनवा आणि फोटो काढुन आम्हाला द्या, मग पेमेंट करु रु.१७०००/- चा पण फोटो दिल्यानंतर ही लोकांना रु.१७०००/- भेटले नाही. सार्वजनिक शौचालयाचा हा प्रश्न मार्गी लागला नाही. मागे मी भेटलो आपल्याला या संदर्भात. या बद्दल विलंब होऊ नये. झोपडपट्टीचे लोकं फिरता इकडे तिकडे. त्यांना का फिरवतात.

मा.आयुक्त :- सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी दक्षता घ्या. जे काही विषय निघत आहे त्याचे कम्पायलेशन तयार करा आणि मी माझ्याकडुन प्रयत्न करतो की, जास्तीत जास्त माझ्याकडे कोणतीही फाईल तीन दिवसाच्यावर पेन्डींग नसते.

श्री.सदाशिव ढेकळे :- जे विभागातले एस.आय. आहे. ते हेतुपुरस्कर ती फाईली आपल्या जवळ ठेवतात. त्याचा अर्थ वेगळा आहे.

श्री.नितीन लढढा :- साहेब असा एक आदेशच काढुन टाका, सर्व विभाग प्रमुखांकडे आलेली फाईलसाठी विविध काल मर्यादा ठरुन घ्या. २ दिवस ३ दिवस आणि तातडीचा असेल तर २४ तास.

मा.आयुक्त :- आपल्या कायद्याच्या तरतुदीमध्ये ७२ सेक्शन आहे. त्यात तरतुद आहे. पण त्याची सर्व जबाबदारी खातेप्रमुखाची आहे.

श्री.नितीन लढढा :- मागे अवजड वाहनांच्या संदर्भात आपण दि.१७/०६/२०१८ ला निर्णय झालेला आहे. त्याच्यामध्ये अवजड वाहने येण्याची वेळ निर्धारीत केलेली होती. निर्धारीत केल्यानंतर त्याची अंमलबजावणी झाली. परंतु याची अंमलबजाणी करण्याची जबाबदारी पोलीस प्रशासनाची होती. त्यामध्ये सकाळी ८.०० ते सायंकाळी ८.०० चा नोटीफिकेशन कदाचित पोलीस डिपार्टमेंटने केलेले असेल.

मा. आयुक्त :- नोटीफिकेशन ज्या वेळेला निघेल त्यावेळेस ते ऑटोमॅटीक ते त्याप्रमाणे होईल.

श्री.नितीन लढढा :- परंतु या सदंर्भात आपला झालेला धोरणात्मक निर्णयासाठी आपण आयुक्त साहेब व सभापती महोदय आपण दोघांनी मा.पोलिस निरिक्षकांना या संदर्भात औगत करुन देणे आणि ही जबाबदारी आपल्या विभागाची असल्याने सकाळी ८.०० ते रात्री ८.०० याच्या मध्ये फक्त दोन ते चार या काळामध्ये रिलॅक्सेशन देण्यात आलेले होते.याच वेळेत अवजड वाहने येतील आणि नंतर रात्री ८.०० ते सकाळी ८.०० वाजेपर्यंत. हे अत्यंत गंभिर विषय आहे. तातडीने आपण या संदर्भात मा.निरिक्षकांना पत्र व्यवहार करावा आणि जे काही नोटीफिकेशन त्यांच्या कडुन काढुन घ्यायचे असेल ते नोटीफिकेशन करुन घ्यावे आणि त्याची तातडीने अंमलबजावणी करणेची विनंती मा.निरिक्षकांना ही करावी. दुसरा मा.सभापती महोदय एक दि.२० ऑगस्ट २०१८ ला शासनाचे निर्देश आले. त्या निर्देशात १५४ खाली दिले की, नियोजन प्राधिकरणाने त्यांचे निर्देशासाठी महाराष्ट्र अधिनियम व नगररचना प्राधिकरण १९६६ ची तरतुदीनुसार विकास योजना तयार करणे त्यास वेळोवेळी अधिनियमातील तरतुदीनुसार सुधारणा करणे बंधनकारक आहे. अश्या विकास योजना सुधारीत नविन रस्ते दर्शविण्यात येतात.विकास योजना मध्ये काही रस्ते प्रत्येक्ष जागेवर आखणी न करण्यात आलेमुळे त्यात भुखंडाची खरेदी विक्री होऊन नागरीकांची फसवणुक होऊ शकते. तसेच त्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम होऊन रस्त्याच्या विकासास तक्रारी निर्माण होतात. तर त्यासाठी राज्यातील सर्व महानगरपालिका , नगरसपरिषदा यांच्या विकास योजना रस्त्यांची आखणी प्रत्यक्ष जागेवर दर्शविणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झालेले आहे सर्व त्यास अनुसरून राज्यातील सर्व महानगरपालिका तसेच महाराष्ट्र विकास प्राधिकरण यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन अधिनियम २६६ कलम १५४ अन्वये खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले आहे . राज्यातील महानगरपालिका तसेच महाराष्ट्र विकास प्राधिकरण यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील मंजुर विकास योजना अंतर्गत प्रादेशिक रस्त्याची आखणी करून प्रत्यक्ष जागेवर करणे बंधनकारक आहे याबाबतची कार्यवाही तातडीने पुर्ण करण्यात यावी. संबंधित पदनिर्देशित अधिकारी / प्रभाग अधिकारी यांनी सर्व रस्त्यांच्या जागेवर अतिक्रमणे / अनधिकृत विकास होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी , म्हणजे कुठलाही डिपी रोड असेल त्यावर कुठल्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही , ते फेरीवाल्याचे असेल किंवा अनधिकृत बांधकाम असेल याबाबत हे निर्देश २० ऑगस्ट २०१८ ला महानगरपालिकेला प्राप्त झालेले आहे आणि दि.२३/०८/२०१८ रोजी यासंदर्भातील मी पत्र तत्कालीन आयुक्तांना दिलेले होते तर मला असे वाटते की नगररचना विभागाचे कोणी अधिकारी असतील तर त्यांना विचारणा करण्यात यावी की दि.२३/०८/२०१८ ला मी दिलेले पत्र तसेच २० ऑगस्ट २०१८ ला निघालेले शासनाचे निर्देश याच्या संदर्भात काय उपाययोजना त्यांनी आखल्या किंवा त्या पत्राचे काय झाले एवढी माहिती विचारल्या नंतर आपल्याला कळेल की आपले विभाग किती सक्षम रित्या काम करत आहे किंवा सदस्यांच्या मार्गदर्शनाचे किती गांर्भीयाने काम करते ही सुध्दा माहिती या सभागृहाला होत नाही. तरी नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांना ही माहिती विचारा .

मा.सभापती :- भाऊ ८ की ९ तारखेला एक पत्र आलेले आहे प्रशिक्षणा / शिबीराचे बाबतचे आहे .

श्री.नितीन लढढा :- होय मिळाले आहे.

मा.सभापती :- आता मी स्वत: पत्र देणार आहे की अधिकाऱ्यांचेही प्रशिक्षण सोबत लावावे जसे समजा की एका बाजुला सर्व सदस्य व एका बाजुला सर्व अधिकारी म्हणजे आपल्याला अपेक्षित असलेले उत्तर मिळाले पाहीजे .

श्री.नितीन लढढा :- बरोबर आहे म्हणजे प्रशासन व आपल्या मध्ये समन्वय साधता येईल .

मा.सभापती :- प्रत्येक विभाग प्रमुखाकडे उत्तर तयारच असतात की माझ्याकडे माणस नाहीत ते आपल्याला मान्य आहे की माणस कमी आहेत काही म्हणतात माहिती घेवुन सांगतो परत एक म्हणतात की अर्थ संकल्पात तरतुद चुकीची केली किंवा नजरचुकीने राहीले मग आपण करत काय आहोत म्हणजे आजची बैठक आटोपुन घ्यायची .

श्री.नितीन लढढा :- हे बघा शासन निर्देश व मी दिलेले पत्राची प्रत आहे.

मा.सभापती :- म्हणजे काय आहे तीन विषय आहेत अडचण नाही , लगेच बैठक संपेल म्हणेज ज्यांना असे वाटते त्यांनी व्ययक्तीक घेवु नका .त्यांना आनंद वाटतो की अर्ध्या तासात बैठक संपणार आहे व बैठक संपल्यानंतर आपापल्या कामाला लागायचे परत पुढील मिटींग मध्ये भगत भाऊ, नितीन भाऊ मांडतील त्यांच्यावर लगेच नविन उत्तर तयार राहील म्हणुन म्हणत आहे की अधिकाऱ्यांनाही एका ठिकाणी घ्या आणि अशा ठिकाणी घ्या की त्या ठिकाणी मोबाईल सुध्दा लागायला नको .

श्री.सुनिल खडके :- कोणाची काय जबाबदारी आहे कोणी काय काम केले पाहीजे . त्यांची लिमीट कीती आहे

मा.सभापती :- काल नियोजन भवनाबाहेर मला एक व्यक्ती भेटली ते म्हणाले की असे - असे प्रशिक्षण होते मग मी म्हणालो की प्रशिक्षण घेतांना अधिकाऱ्यांचेही प्रशिक्षण घ्या आम्ही तर शिकुन जावु पण ज्यावेळेला आम्ही सभागृहात मांडु की अशी -अशी तरतूद असते किंवा नियोजन असते तेव्हा आपल्याला उत्तर मिळते की मी अभ्यास केलेला नाही पुढील सभेस मी आपणांस सांगतो असे निर्णय थांबुन जातात , तर ती व्यक्ती दोन मिनिटांत तेथुन निघुन गेली .व ते म्हणाले तुम्ही जे सांगत आहेत ते योग्य आहे.

श्री.भगत बालाणी :- माझी एक विनंती आहे सोबत प्रशिक्षण घेवु नका, कारण की एक उदाहरण देतो की , एक पुढारी होता त्याच्या मुलाला इंग्रजी शिकायचे होते तो त्याच्या मुलाला लंडन येथे पाठवितो शिकायला नंतर पुढारी त्या

ठिकाणी जातो त्या हायस्कुल मध्ये तो त्या ठिकाणी प्रिंसिपल ला भेटतो व प्रिंसिपल त्याला शिकवत असलेल्या टिचर ला बोलावतो व टिचर येतो व पुढारी त्या टिचर ला विचारतो की माझा मुलगा कसा आहे तर तो टिचर काय म्हणतो लय बेस्ट.
श्री.नितीन लढढा :- भाऊंचे म्हणणे काय आहे की अधिकारी आधीच हुशार असतात .
श्री.चेतन सनकत :- फुले मार्केट विषयी मला बोलायचे आहे आरोग्य विभागाविषयी.
मा.सभापती :- या आधी जर तो विषय झालेला असेल तर नाही .
श्री.चेतन सनकत :- हा विषय झालेला नाही आता फुले मार्केटची समस्या सर्व सदस्यांनी ऐकली त्यामध्ये एक विशेष अशी एक समस्या आहे फुले मार्केटच्या मागील गेट जवळ एक शौचालय आहे ती वर्षानुवर्षा पासुन बंद पडलेली आहे माझ्या मते ३ ते ४ वर्षापुर्वी त्याचे टेंडर निघाले होते , त्यानंतर आरोग्याधिकारी यांनी काय केले याबाबत त्यांना विचारा कारण त्या शौचालयास आज पावेतो कुलुप लावलेले आहे . त्या ठिकाणी महिला असो की पुरूष असो यांना शौचालयासाठी कुठे जावे लागते हे ही विचारा त्या ठिकाणी आज लॉक आहे .
मा.सभापती :- साहेब कुणाकडे आहे हा विषय ?
श्री.चेतन सनकत :- आरोग्य विभागास विचारणा करा.
श्री.विकास पाटील :- भाऊ मी माहिती घेवुन सांगतो .आपले एक पे ॲन्ड युज चे शौचालय सुरू आहे .
श्री.चेतन सनकत:- ते मला माहिती आहे मी एल पटटा , मागील गेटजवळील म्हणत आहे. ते आज बंद आहे त्याचे टेंडर निघाले मक्तेदाराने काम केले नाही त्यावर प्रशासनाकडुन काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही आज पर्यंत ती बंद आहे .
मा.आयुक्त :- सन्मा .सदस्य आपला मुद्दा लक्षात आला , आपली अडचण योग्य आहे आता ४ गाळे आपण ताब्यात घेतले आणि हे शौचालय पे ॲन्ड युज या तत्वावर सुरू करू. व व्यवस्था होईल .
श्री. नितीन लढढा :- सभापती महोदय एक महत्वाचा विषय आहे , कालच सकाळी दिव्य मराठी मध्ये बातमी वाचली की समांतर रस्त्याच्या कामासाठी प्रत्यक्षात अधिकृत रित्या असेल परंतु कामाला सुरूवात झालेली आहे आणि त्यामध्ये काय काय बदल अपेक्षित आहे ते आपल्याला माहिती आहे त्यात सर्वात महत्वाची जबाबदारी येईल ती महानगरपालिकेची त्या डिव्हाईडर मध्ये ईलेक्ट्रीकल पोल लावायचा समजा उद्या असे होईल ज्या संत गतीने आपण प्रवास करतोय त्याच गतीने जर प्रवास झाला तर हायवे ऑथरिटी त्यांचे काम करून निघुन जाईल .
श्री.सुनिल खडके :- भाऊ मागील वेळी पण आपण व आम्ही सांगीतले होते .
श्री.नितीन लढढा :- मी तेच म्हणतोय सुनिल भाऊ त्याचे नियोजन आत्ताच जर केले तर जवळपास ४ महिने लागतील , शहरातुन कालींका माता मंदिरापासुन ते खोटे नगर पावेतोचा ८ किलीमीटर चा रस्ता आहे , साईडला असलेले पोल आपल्याला काढावे लागतील कारण त्यामुळे अडथळा होईल .
मा.सभापती :- भाऊ आपण याच्या संदर्भात अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे त्यात सिंग्नल पॉईंट घेतलेले आहे का
श्री.नितीन लढढा :- नाही सिग्नल पॉईंट येणार नाही . तो भाग वेगळा झालेला आहे . आज रोजी जी कामाला सुरूवात झालेली आहे .
मा.आयुक्त :- म्हणजे ते काम जे आहे ते दोन तीन टाईप मध्ये करायचे .
श्री.नितीन लढढा :- होय त्यात काय झाले की ज्यावेळी १४१ कोटी रूपयांचा डि पी.आर ज्यावेळी हायवे ॲथारिटीला पाठविण्यात आलेला होता त्यामध्ये हे काम ईन्क्लुडिंग होते परंतु नॅशनल हायवे ॲथारिटीने हे काढुन व त्यांनी सांगीतले की रस्त्यांची कामे पुरविणे ही नॅशनल हायवे ॲथारिटी ची जबाबदारी आहे . व त्या रस्त्यावर ईलेक्ट्रीकल सुविधा पुरविण्याची जबाबदारी नाकारली आणि ती नाकारल्यामुळे स्थानिक प्राधिकरण म्हणुन ती जबाबदारी महानगरपालिकेवर आली याच्या संदर्भातील ज्या-ज्यावेळी अधिकाऱ्यासोबत बैठकी झाल्या त्यामध्ये ती क्लीअर झाली आणि आजच्या वृत्तपत्रातील बातमी मध्ये सुध्दा तोच संदर्भ आहे की ती जबाबदारी स्थानिक प्राधिकरण म्हणुन महानगरपालिका पुर्ण करेल माझे म्हणण्याचे तात्पर्य एकच आहे की एकदा समांतर रस्ता तर तयार होवु द्या व रस्त्याचे रुंदीकरणाचे काम पुर्ण होवुन जाईल आणि मग त्यावेळेला हा प्रश्न उपस्थित होईल की नॅशनल हायवे ॲथारिटी म्हणेल की ही जबाबदारी आमची नव्हती ती स्थानिक प्राधिकरण म्हणुन महानगरपालिकेची होती तर आपण त्यावेळी सुरूवात करू तर त्या गोष्टीला आपले जवळपास ४ ते ६ महिने जातील तर तो ४-५ महिन्याचा विलंब वाचावा त्या दृष्टीने त्याचे नियोजन आत्ताच होणे गरजेचे आहे.
मा.आयुक्त :- त्याचे नियोजन आपल्याला आता ऑन पेपर करता येईल , पण त्यासाठी जो निधी लागेल तर तो विषय वरिष्ठ पातळीवर ठेवावा लागेल .
श्री.नितीन लढढा :- डिपीडीसी मधुन करावे व डिपीडीस मधुन जर मिळत नसेल तर जे १०० कोटी चे जे नियोजन आपण केलेले आहे त्यातील काही अनावश्यक कामे आहेत ते तुम्ही विचार करावे की ज्या कामांची आज आवश्यकता नाहीये , ज्यावेळी आपल्याकडे निधी उपलब्ध होईल अशी कामे नंतर करावी जास्त नाही ४-५ कोटी रू जातील . असे करा की ज्याची आज प्राथमिकता नाही परंतु या कामाची अत्यंत प्राथमिकता आहे कारण तेथे

लवकरच रस्ते तयार होतील पण दिवेच नसणार आणि मग आपण निधी किंवा त्याच्या संदर्भातील नियोजन करत बसलो तर कमीत कमी त्यामध्ये ३ ते ४ महिने जातील म्हणुन त्याचे नियोजन करावे व कशा पध्दतीने करायचे हा मुद्या तुमचा आहे .

मा.सभापती :- या विषयी आम्ही बसुन चर्चा करू व नियोजन करू आपण आता शेवटचा विषय करू व सभा संपन्न करू.

श्री.प्रविण कोल्हे :- मा. महोदय जेव्हा पासुन लोकप्रतिनिधी झालोय तेव्हापासुन वाल्मिक नगर, मन्यार वाडा , मेस्को माता नगर , खेडीचा भाग , आंबेडकर नगर या ठिकाणी स्ट्रिट लाईटस चा मोठया प्रमाणात त्रास आहे आपण त्या भागात रात्रीच्या वेळी जाऊ शकत नाही त्या ठिकाणी काम करण्यासाठी १०० रू प्रमाणे प्रत्येकी खांबाप्रमाणे पैसे द्यावे लागतात जेव्हापासुन लोकप्रतिनिधी झालेलो आहे महासभेमध्ये सुध्दा हा मुद्या मांडला परंतु आजपावेतो काहीच झालेले नाही .

मा.आयुक्त :- काय विषय आहे सांगा

श्री.सुशिल सांळुखे :- त्यांना त्या ठिकाणी ॲथॉरायझेशन करून  पोल वर चढण्यासाठी परवानगी देता येईल .

मा.आयुक्त :- आज काही सोल्युशन असेल तर सांगा करुन टाकु आपण

मा.सभापती :- प्रविण भाऊ जो काही निर्णय घेवु तो संपुर्ण शहराचा असेल तो फक्त एका प्रभागासाठी राहणार नाही म्हणुन आता तात्काळ त्यावर निर्णय घेवु शकत नाही .

श्री.प्रविण कोल्हे :- अडचण अशी आहे की सध्या पावसाळयाचे दिवस आहेत .

श्री.चेतन सनकत :- मी दि.२०/०६/२०१९ रोजी झालेल्या सभेत विषय उपस्थित केलेला होता वॉटर टँकर बद्दल आज २५ दिवस झालेले आहे. वॉटर टँकर सुरु झाले नाही आणि आज ही शौचालयामध्ये परिस्थिती जशीची तशीच आहे.

श्री.नितीन लढढा :- डंपर जे आमच्या प्रभागात काम करते. एम.एच.१९ एच ९२०० व्हॅक्युम अम्पटीफायर अत्यंत महत्वाचे वाहन आहे. आज नविन बॅटरीचा रिपोर्ट देऊन चार महिन्याचा कालावधी झाला. यात सरकस काय चालु आहे ह्या वाहनाची बॅटरी काढायची त्या वाहनाला लावायची, चालु करायची, पुन्हा त्या वाहनाची बॅटरी परत लावायची.

श्री.एस.एस.पाटील :- या वाहनाची बॅटरी नादुरुस्त झालेली होती आणि त्यावर दुसरी बॅटरी लावलेली होती. तर ती बॅटरी पुर्णपणे नादुरुस्त झाल्याचा रिपोर्ट परवाच आलेला आहे. तर लगेच प्रस्ताव तयार करुन नविन बॅटरी खरेदीचा प्रस्ताव आपण तयार करत आहे. वॉटर टँकरचा जो विषय झाला होता मागच्या सभेत. वॉटर टँकर जे खराब आहे ते आपण संबंधीत अधिकृत ठिकाणी पाठवुन त्यात काय काय दुरुस्ती आहे ही तपासण्यात आली. त्याच्यानंतर तो जो विक्रेता आहे कार्यादेश शिवाय काम करत नाही. तर मंजुरी होऊन आपण कार्यादेश ही आपण त्याला दिलेले आहे आणि काम ही आता सुरु झालेले आहे. दोन दिवसात रिपेअरींगचे काम पुर्ण होईल.

श्री.चेतन सनकत :- विषय समजुन घ्या तुम्ही रिपेअरींगचा भाऊ बोलले मी नविन वाहनांबद्दल बोलत आहे.

श्री.एस.एस.पाटील :- जी नविन वाहने आहे. त्याच्या वरती पंप आपल्याला आवश्यक आहे. त्याच्या बद्दल तीन चार लोकांना आपण बोलविले. त्यावेळेस आरोग्यधिकारी सुध्दा होते. त्यांना सर्व दाखवुन आपण त्यांच्याकडुन ते कोटेशन मागितलेले आहे. कोटेशन आल्यानंतर त्याची मंजुरी घेऊन पुढची कार्यवाही आरोग्य विभागामार्फत करण्यात येईल.

मा.सभापती :- हे तर तुम्ही मागच्या मिटींग मध्ये झाले होते ते बोलत आहे.

श्री..एस.एस.पाटील :- ते जे वॉटर पंप आहे. त्याची असेम्बलींग जे आहे ते पुर्ण व्हायला पाहिजे. याचे कोटेशन आपण मागविलेले आहे. आता कोटेशन आल्यानंतर आपण कार्यवाही करु.

श्री.चेतन सनकत :- साहेब असे किती स्पॉट आहे जिथे पंप आवश्यक आहे आणि किती असे स्पॉट आहे ज्या ठिकाणी बिना पंपाचे पाणी पोहचु शकतात.ज्या ठिकाणी बिना पंपाचे पाणी पोहचवु शकतात. त्या ठिकाणी का नाही पुरवु शकता आपण .

श्री.उदय पाटील :- असे एकुण ८ ठिकाण आहे जिथे गाडी जात नाही.

श्री.चेतन सनकत :- मग त्या आठ ठिकाणांचे काय आहे. माझ्या प्रभागात तर ही परिस्थिती आहेच पण सर्व प्रभागात पण असेच आहे. शनिपेठ मधले बोलतो मी माझ्या प्रभागाबद्दल त्या ठिकाणी जर पंप नसेल तरी पाणी पुरवठा होऊ शकतो.नविन वाहन खाली जशेच्यातशे उभे आहे.

श्री.विकास पाटील :- आज जर पुरवठा दिलं तर बिना पंपाचे आपण काम करु शकतो.

मा.आयुक्त :- जेव्हा आपण अत्यावश्यक सेवा देतो त्यावेळेस अश्या गोष्टी सभागृहात यायलाच नाही पाहिजे. पाणी पुरवठा असतील आरोग्य असतील हे मिटींग मध्ये चर्चा करण्याचे विषयच नाहीत. जर तुम्हाला खरंच काही अडचण आहे की तुम्ही त्यांना पेमेंट देऊ शकलो नाही किंवा त्याचे वरचे काम अशी चर्चा आपण समजु शकतो. हे दैनंदिन आपल्या कामकाजाचाच भाग आहे. कुठेतरी आपण आत्मनिरिक्षण करायला पाहिजे.

मा.सभापती :- टॉयलेट व्हॅनचा विषय कुठपर्यंत आलेला आहे.

श्री.उदय पाटील :- टॉयलेट व्हॅनचा ठराव झालेला आहे. जळगांव शहरामध्ये कोणालाही टॉयलेट व्हॅन पाहिजे असेल तर त्यांनी आपल्याकडे देखभाल दुरुस्तीसाठी रु.५०००/- डिपॉझिट आणि त्याचा रु.५०००/- भाडे आहे. परंतु जर क्रिडा, धार्मिक किंवा सामाजिक कार्यासाठी पाहिजे असेल तर निम्मे त्याचे भाडे आहे. रु.२५००/- दिवसाला आहे आणि रु.१२५०/- या सामाजिक आणि क्रिडा वाल्यांना आहे. जळगांव जिल्ह्या मध्ये जर कोणाला पाहिजे असेल तर रु.१०,०००/- डिपॅझिट आणि त्याचा रु.५०००/- भाडे आहे.

श्री.नितीन लढढा :- लोकमतला उपमहापौरांची एक प्रेसनोट आली होती. आरोग्याचे गांर्भिय प्रशासनाला ही आहे आणि सभागृहाला ही आहे. आणि त्याच्या संदर्भात आरोग्यची स्थिती गंभिर आहे की अधिकाऱ्यांची मिलीभगत असल्याचा उपमहापौरांचा आरोप आहे. एक जमिनीचा १००% मोबदला १९९५ ला दिला गेला काही तांत्रिक कारणांने त्याचा अवार करुन घेण्याच्या संदर्भात ती चुक राहिली. प्रशासनाने प्रयत्न केले. उच्च न्यायालयाने त्याचा निकाल महापालिकेकडुन केला. सर्वोच्च न्यायालयाने महापालिकेच्या विरोधात दिला. प्रश्न तो नाही आहे. ज्यावेळेला महानगरपालिकेचे पदाधिकारी जे आज महानगरपालिकेचे उपमहापौर आहे. ते असे आरोप करत असतील तर जळगांव शहराची जनता याला गांभिर्याने घेणार. कुठेतरी प्रशासन कर्मचारी आणि पदाधिकारी यांच्यात संवाद नाही आहे किंवा समन्वय नाही आहे असे एक चित्र निर्माण होते. हे पदाधिकाऱ्यांच्या दृष्टीकोणातुन ही आणि अधिकाऱ्यांच्या दृष्टीकोणातुन ही योग्य नाही. आयुक्त साहेबांची मी परिस्थिती समजु शकतो. सेकंड टाईम पिटीशन फाईल झालेली आहे. ही भुमिका ही टाळु शकत नाही आपण कारण ते पिटीशन आयुक्तांना फेस करायचे आहे. या पध्दतीचा भुसंपादनाचा मोबदला देण्यात येऊ नये असा ठराव ही सभागृहाने पारित केलेला आहे. त्याच काय झाल मला माहित नाही. जेव्हा तत्कालीन आयुक्त श्री.डांगे साहेब होते तेव्हाच त्यांनी तो ठराव विखंडनाला पाठविलेला होता. मग तो ठराव राज्य शासनाकडुन विखंडन होऊन आला का ? हाही एक मुद्या उपस्थित होतो आणि मग एखादा धोरणात्मक निर्णय हा महासभेने घेवुन हा मोबदला अदा करण्यात येवु नये कारण महानगरपालिकेसाठीची या सभागृहाची भुमिका ही सुध्दा खुप प्रामाणिक होती की एखाद्या जागेचा मोबदला १०० टक्के दिल्यानंतर पुन्हा या महानगरपालिकेवर आर्थिक बदल येणे हेही काही योग्य वाटत नाही मग अश्या परिस्थिती मध्ये महासभेने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाला काही किंमत नाही का ? आयुक्तांनी प्रशासनाची भुमिका ती योग्य पध्दतीने हाताळलेली आहे यामध्ये ही काही दुमत नाहीये परंतु अशा परिस्थिती मध्ये त्या ठरावाचे काय झाले याची माहिती या सभागृहाला द्यायची होती किंवा त्या ठरावावर कायदेशीर मार्गदर्शन राज्य शासनाकडुन प्राप्त करणे हे सुध्दा अपेक्षित होते त्यामुळे अशा संभ्रमाचे व पध्दतीचे वातावरण निर्माण होत आहे या मध्ये सर्वोच्च न्यायालयाने निवाडा दिलेला आहे परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या निवाडयानंतर सुध्दा सुनावणीच होत नाही किंवा सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा हा अंतिम निवाडा आहे असेही नाही याकुब मेमनच्या केसमध्ये फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली राष्ट्रपतीने दयेचा अर्जही फेटाळला आणि सुप्रिम कोर्टात पुन्हा याचिका दाखल झाली. त्याला म्हणतात रिट पिटीशन आणि त्या पिटीशनमध्ये सर्वोच्च न्यायालयाने रात्री २.०० वाजता सुनावणी घेतली. माझे म्हणणे हेच आहे की या संपुर्ण प्रकरणात आयुक्ताची भुमिका प्रमाणिक आहे सभागृहाची भुमिका प्रमाणिक आहे. परंतु कायद्याच्या काही त्रुटींचा फायदा उचलत जमिन मालक किंवा त्यांना दिशा देणारे वकील, आपण एकीकडे म्हणतो हरिष साळवे सारखे वकील जे देशाच्या वर्चस्व वाचविण्यासाठी नाममात्र एक रुपया घेऊन अंतरराष्ट्रीय स्तरावर सेवा देतात. काही लोकं इथेच जन्म घेतात आणि इथेच महानगरपालिकेच्या जमीनवर आर्थिक शोषण करतात. माझी विनंती आहे आयुक्त साहेब या संदर्भात मा.श्री.गिरीष भाऊंना भेटुन रिट पिटीशन दाखल करण्याची भुमिका मांडावी कारण जमिनीचा मोबदला दिलेला आहे आपण. आज मा.आयुक्तांनी कन्टेम्ट पिटीशन दाखल करण्याची भुमिका घेतली ती योग्य आहे. परंतु हा पैसा वाघाच्या जबडयात चाललेला आहे तो काढणे थोड अवघड आहे. पंरतु अशक्य नाही. याच्यासाठी सुध्दा राज्य शासनाच्या माध्यमातुन मा.आयुक्त साहेबांनी प्रधानसचिव आणि मा.मुख्यमंत्री साहेबांना विनंती करावी आदरनीय राजु मामा भोळे यांना विनंती करुन की ही एक शेवटची रेमेडी आहे कन्टेम्ट पिटीशन, कारण ७.५ कोटी नाही आहे आर्धी रक्कम आहे असे ते १३ कोटी आहे. आपण गांर्भियाने याचा विचार करुन हे कन्टेम्ट पिटीशन राज्य शासनाचे जे महामंत सर्वोच्च न्यायालयामध्ये काम करत असतील त्यांचे माध्यमातुन हे करुन पाहणे गरजेचे आहे. तरी हा महानगरपालिकेचा पैसा वाचु शकतो.

मा.आयुक्त :- हे सगळं प्रकरण ५ वेळेला उच्च न्यायालयासमोर व २ वेळा सर्वोच्च न्यायालयासमोर आलेले आहे. तर मेरीटवर जो काही विषय आहे त्याच्यावर भाष्य करणे योग्य होणार नाही. दि.०८ जुलै २०१९ रोजी आपले जे उच्च न्यायालयाचे वकील आहे त्यांचा मला फोन आला की असे हे मॅटर आहे आणि महानगरपालिकेची भुमिका काय असेल ? तर त्यांना आम्ही विनंती केली की, आम्ही असा प्रस्ताव पाठविलेला होता. त्यामुळे आपले अकाऊंट ही सिज झालेले होते. त्यावेळेला हायकोर्टने तिव्र नाराजी व्यक्त केली. मागच्या आयुक्तांनी काही केले नाही, नविन कोण आयुक्त आले त्यांचे नांव घ्या त्यांना पुढच्या वेळेस हजर राहायला सांगा.हे तोंडी झाले. त्यानंतर वकीलाने असे सांगितले, तुम्हाला हे इमिजेट भरणा करणे आवश्यक आहे किंवा तुम्हाला पर्सनली हे कंटेमप्ट फेस करावे लागेल.मधल्या कालावधी मध्ये पदाधिकाऱ्यांशी सुध्दा चर्चा झालेली होती. आणि आपले सन्मा. सदस्यांनी सांगितले

की आपण पी.आय.एल. दाखल करु. त्याप्रमाणे पी.आय.एल. ही दाखल केले आणि ते पी.आय.एल. सुध्दा फेटाळले गेले. सुप्रिम कोर्टामध्ये आपले पी.आय.एल. फेटाळले गेले दि. १० मार्च २०१७ ला दुसऱ्यांदा सर्वोच्च न्यायालयाने फेटाळले दि.१८/०२/२०१९ ला आणि ५ वेळेला ही जी बाजु आहे महानगरपालिकेची हायकोर्टाने मान्य केलेली नाहीये . विषय फक्त नुकसान भरपाई पुरता न करता हायकोर्टाचे म्हणणं होतं महानगरपालिका काहीच करत नाही असे एक चित्र निर्माण झाले होते . आता जो ठराव आपण विखंडनाला पाठविला, तो ठराव शासनाने निलंबीत केला. पण हायकोर्टाच डिसीजन शासनाच्या वरचा भाग नाही. म्हणुन त्याच्यावर दुसरा कोणताही पर्याय नव्हता मग आपल्याला कंटेंमप्ट फेस करावे लागले असते म्हणून सात कोटी अठठयाहनऊ लाख रू अशी ही रक्कम डिपॉझिट केलेली आहे आता हे सगळ माहित असतांना अशा कुठल्या अथॉरिटी ने आपल्याला स्टे दिला की हे पुढील पैसे भरावे लागू नये तर आपल्याला निश्चित पणे त्याचे पालन करावे लागेल पण आज कुठल्याही अथॉरिटीचा असा कुठलाही निर्णय नाहीये आणि मी त्यापलिकडे जात नाही कारण वस्तुस्थिती सभागृहाला माहिती आहे त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणे ही कुठल्याही शासकीय अधिकाऱ्याची जबाबदारी असते त्याच्यामुळे आम्ही घाईघाईत पैसे भरले किंवा मग तुम्हाला अंधारात ठेवले तर हे अंधारात नाही प्रत्येक वेळी हा विषय सभागृहापुढे आलेला आहे आणि अनेक वेळा चर्चेमध्ये ही आलेला आहे आता याच्या पुढची जी पायरी आहे कुठल्याही पीआयएल च्या माध्यमातुन किंवा प्युरिफिकेशनच्या माध्यमातुन जर आपल्याला पुढचे भरावे लागले नाहीत तर ते निश्चित आपल्याला फायदेशीर राहील

श्री.नितीन लढढा :- हिताच्या अनुषगांने प्रयत्न करायला पाहीजे काय होते की , आपल्या महानगरपालिकेच्या वकीलांचे ईम्प्रेशन काय आहे कोर्टामध्ये हे आपल्यालाही माहिती आहे परंतु राज्य शासनाचा वकील ज्या वेळेला बोलतो किंवा बाजु मांडतो आणि आम्हाला हे मान्य आहे की आमची जी तांत्रिक चुक घडलेली आहे परंतु तांत्रिक चुकीचा ईतका मोठा भुर्दंड कुठेतरी लोकांनी सहानुभतिपुर्वक विचार करायला पाहीजे कुठेतरी कोर्टही सहानुभुतिपुर्वक विचार करतात परंतु बाजु कोण मांडतय कीती प्रभावीपणे मांडत आहे किती सक्षमतेने मांडत आहे , आज आपण आंतरराष्ट्रीय कोर्टात जर कधी एखाद्या महानगरपालिकेच्या वकीलांना पाठविले असते तर हा प्रपोगंडा झाला नसता कारण शेवटी कायद्याचे ज्ञान , बाजु मांडण्याची एक सचोटी आणि त्याची बाजु ऐकून घेण्याची न्यायालयाची भुमिका ही आपण वेळोवेळी बघत असतो की कोण कीती प्रभावी पणे मांडतोय .

मा.आयुक्त :- आपण जे सांगत आहात ते बरोबर आहे राज्य शासनाकडे फक्त आपली महानगरपालिका नाही ३८४ वेगवेगळे विषय आहेत त्यामुळे ही क्युबेटीक पिटीशन फार हे झालेली आहे आणि मला वाटत नाही की राज्य शासन याच्यात काही बोलु शकेल .

श्री.नितीन लढढा :- साहेब आपण प्रयत्न केल्यानंतर राज्य शासन या विषयी बोलु शकते आणि हे कसे आहे की सन्मा.पदाधिकारी यांनी मांडायला पाहीजे .

मा.आयुक्त :- राज्य शासन म्हणजे आपण सचिवांकडे पाठविले मागच्याच वेळेला पहा ५-५ वेळेला मॅटर त्यांच्यापुढे जात आहे , सुप्रिम कोर्टापर्यंत जात आहे याच्यात काय मार्ग आहे .

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, राष्ट्रगीतासाठी सर्वांनी उभे राहावे.

राष्ट्रगीता नंतर येणे प्रमाणे सभेचे कामकाज संपन्न झाले.

सही/-

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**